RNI No. MAHBIL /2009/35827

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग दोन–संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष १२, अंक ११] गुरुवार ते बुधवार, मार्च १२–१८, २०२६/फाल्गुन २१–२७, शके १९४७ [पृष्ठे ९, किंमत : रुपये १५.००

### प्राधिकृत प्रकाशन

**संकीर्ण सूचना व जाहिराती**

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**

**प्रस्तावित योजनांची अधिसूचना**

No. MSETCL/CO/PS/Scheme-I/RE/PN/01826.—विद्युत कायदा, २००३ च्या कलम १६४ प्रमाणे व महाराष्ट्र शासनाच्या आदेश क्रमांक ०६/ प्र.क्र.३१२/ उर्जा/४, दिनांक २४.०८.२००६ (**शासकीय राजपत्र** पान क्रमांक २८०) नुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीस प्रदान केलेल्या अधिकारानुसार, खाली नमूद केल्याप्रमाणे अति उच्च दाब पारेषण योजनेचे काम महापारेषण कंपनीच्या देखरेखीखाली करण्याचे प्रस्तावित करीत आहे. जनतेच्या माहितीकरिता ही अधिसूचना देण्यात येत आहे.

**२.** खालील योजना नूतनशील ऊर्जेचे निष्कासन करण्यासाठी आहे.

**योजनेचे नाव :** नंदुरबार जिल्ह्यातील धामदोड, ता. नंदुरबार येथे मे. इंटिग्रम एनर्जी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांच्या ५० मे.वॅ. पवन ऊर्जा प्रकल्पातील विजेचे निष्कासन करणेबाबत.

**वाहिनीचे नाव :** १३२ के. व्ही. नंदुरबार -शहादा वाहिनीवर लिलो करुन दुहेरी परिपथ वाहिनी दुहेरी परिपथ मनोऱ्यावर १३२ के. व्ही. पवन ऊर्जा प्रकल्प उपकेंद्रापर्यंत उभारणे - २ कि.मी. (OPGW सह.)

सदर वाहिनीचा मार्ग खालील महसुली गावाच्या परिक्षेत्रातून प्रस्तावित आहे.

| जिल्हा | तालुका | गावाचे नाव |
|---|---|---|
| नंदुरबार | नंदुरबार | धामदोड |

या योजनेचा अंदाजे खर्च रु. १२८०.३९ लाख इतका आहे.

**३.** परवानेधारक अगर हितसंबंध असलेल्या व्यक्तीने हवे असल्यास, ही सूचना प्रसिध्द केलेल्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या विचाराकरिता पारेषण कंपनीस प्रतिवेदने पाठवावीत, अशी त्यांना अधिसूचना देण्यात येत आहे. याबाबतची अधिक माहिती मुख्य अभियंता (प्रकल्प योजना), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, ३ रा मजला, प्रकाशगंगा, प्लॉट नं. सी-१९, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांचेशी वेळीच संपर्क साधून मिळू शकते.

सही,
संचालक (प्रकल्प)(प्रभारी),
महापारेषण, मुंबई.

मुंबई,
दिनांक : २६ फेब्रुवारी २०२६.

**महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित**

**प्रस्तावित योजनांची अधिसूचना**

No. MSETCL/CO/PS/Scheme-I/RE/PN/01823.—विद्युत कायदा, २००३ च्या कलम १६४ प्रमाणे व महाराष्ट्र शासनाच्या आदेश क्रमांक ०६/ प्र.क्र.३१२/ उर्जा/४, दिनांक २४.०८.२००६ (**शासकीय राजपत्र** पान क्रमांक २८०) नुसार, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीस प्रदान केलेल्या अधिकारानुसार, खाली नमूद केल्याप्रमाणे अति उच्च दाब पारेषण योजनेचे काम महापारेषण कंपनीच्या देखरेखीखाली करण्याचे प्रस्तावित करीत आहे. जनतेच्या माहितीकरिता ही अधिसूचना देण्यात येत आहे.

**२.** खालील योजना नूतनशील ऊर्जेचे निष्कासन करण्यासाठी आहे.

**योजनेचे नाव :** धुळे जिल्ह्यातील शिरधाने प्र. नेर, ता. धुळे येथे मे. अवादा एनर्जी प्रा. लि. यांच्या ४०० मे.वॅ. सौर ऊर्जा प्रकल्पातील विजेचे निष्कासन करणेबाबत.

**वाहिनीचे नाव :** ४००/२२० के. व्ही. धुळे उपकेंद्रातून दुहेरी परिपथ वाहिनी (दुहेरी परिपथ मनोऱ्यावर ३ कि.मी. व बहु परिपथ मनोऱ्यावर २७ कि.मी.) २२० के.व्ही. सौर उर्जा प्रकल्प उपकेंद्रापर्यंत उभारणे (OPGW सह.)

सदर वाहिनीचा मार्ग खालील महसुली गावाच्या परिक्षेत्रातून प्रस्तावित आहे.

| जिल्हा | तालुका | गावाचे नाव |
|---|---|---|
| धुळे | धुळे | कुंडाणे (वरखेडे) |
| | | बिलाडी |
| | | नगांव बु |
| | | भोकर |
| | | गोंदुर |
| | | निमदाळे |
| | | मेहेरगाव |
| | | नवलाणे |
| | | कावठी |
| | | शिर्धाने प्र. नेर |

या योजनेचा अंदाजे खर्च रु. ८५८१.२८ लाख इतका आहे.

**३.** परवानेधारक अगर हितसंबंध असलेल्या व्यक्तीने हवे असल्यास, ही सूचना प्रसिद्ध केलेल्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितच्या विचाराकरिता पारेषण कंपनीस प्रतिवेदने पाठवावीत, अशी त्यांना अधिसूचना देण्यात येत आहे. याबाबतची अधिक माहिती मुख्य अभियंता (प्रकल्प योजना), महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, ३ रा मजला, प्रकाशगंगा, प्लॉट नं. सी-१९, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१ यांचेशी वेळीच संपर्क साधून मिळू शकते.

सही/

मुंबई,
संचालक (प्रकल्प)(प्रभारी),

दिनांक : १६ फेब्रुवारी २०२६.
महापारेषण, मुंबई.

## बृहन्मुंबई महानगरपालिका

## अधिसूचना

क्रमांक प्र.अ./वि.नि/१५८३२।पू.उप.—ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे " उक्त अधिनियम" असा उल्लेख करणेत आलेला आहे) चे कलम ३१, पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने अधिसूचना क्र. टिपीबी ४३१७ /६२९/प्र.क्र.११८/२०१७/वि.यो./नवि-११, दि. ८/०५/२०१८ (यापुढे " उक्त अधिसूचना" असा उल्लेख करणेत आलेला आहे. त्याद्वारे बृहन्मुंबई प्रारूप विकास योजना - २०३४ ( यापुढे " उक्त विकास योजना" असा उल्लेख करणेत आलेला आहे) सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ ला मंजुरी दिली आहे.

ज्याअर्थी, मंजूर विकास आराखडा २०३४ नुसार, 'एम / पूर्व' विभागातील मौजे आणिक मधील न.भू.क्र. ३८१ (पैकी) वरील १४, १८०.२५ चौ. मी. इतका भूखंड उद्यान/ बगीचा (ROS १.५ ) या आरक्षणाने बाधित आहे.

ज्याअर्थी, स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी त्यांच्या दि. १७.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये 'एम / पूर्व' विभागातील मौजे आणिक मधील न.भू.क्र. ३८१ (पैकी) वरील १४, १८०.२५ चौ. मी. ह्या भूखंडावरील उद्यान / बगीचा ( ROS १.५ ) या आरक्षणामध्ये तरण तलाव (ROS २.२ ) हे आरक्षण समविष्ट करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ३७ (१) अन्वये बदल करण्याबाबत विनंती केली.

ज्याअर्थी, उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांची त्याबाबत मंजुरी प्राप्त केल्यानंतर मा. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची मान्यता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ३७ (१) अन्वये बदल करण्याकरिता प्राप्त झाली आहे.

ज्याअर्थी, महानगरपालिकेचे परिपत्रक क्र. बीएमसी/ एडीएमएन/३ दि. ०७.०४.२०२२ नुसार अद्यावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६ क (१) अन्वये महानगरपालिका आणि महानगरपालिकेच्या इतर प्राधिकरणांचे सर्व अधिकार आता प्रशासकांकडे निहित आहेत.

ज्याअर्थी, प्रशासक (सुधार समिती) यांनी ठराव क्र. ७४ दि. २७.११.२०२५ अन्वये व प्रशासक (महानगरपालिका) यांनी ठराव क्र. ८७५ दि. ०४.१२.२०२५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ३७ (१) मधील तरतुदीनुसार मंजूर विकास आराखडा, २०३४ मध्ये फेरबदल करण्याच्या प्रस्तावाची कार्यवाही सुरू करणे, विहित कालावधीमध्ये सूचना / हरकती मागविणे व प्राप्त सूचना / हरकतींवर सुनावणी घेणे आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ (२) नुसार फेरबदल प्रस्तावास महाराष्ट्र शासनाची अंतिम मंजुरी घेणेकरिता नगरविकास विभाग खात्याशी पत्रव्यवहार करण्याची मंजुरी दिली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ च्या पोट-कलम (१) आणि (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून नियोजन प्राधिकरण, किंवा राज्य सरकारने असे निर्देश दिल्यावर, अशा निर्देशांच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत कोणत्याही व्यक्तीकडून सूचना/आक्षेप मागवण्याकरिता नोटीस प्रकाशित केली जाईल आणि सुनावणी दिल्यानंतर, प्रस्तावित बदल राज्य सरकारला सादर करण्यात येईल. सदर बदल मंजूर करणे किंवा मंजुरी देण्यास नकार देणे हे राज्य सरकारच्या अधीन राहील.

आणि त्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील सर्व अधिकारांचा वापर करून, बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे प्रस्तावित फेरबदलाविषयी उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) नुसार कोणत्याही व्यक्तीकडून हरकती / सूचना, मागविण्यासाठी तसेच संभाव्य बाधित होणाऱ्या व्यक्तींच्या माहितीसाठी सदर सूचना प्रसिद्ध करीत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून असेही कळविण्यात येत आहे की, वरील प्रस्तावित फेरबदलाविषयी कोणत्याही हरकती/सूचना, सदर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत लेखी स्वरुपात प्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे महानगरपालिका मुख्यालय, ५ वा मजला, विस्तारित इमारत, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. सदरच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या हरकती/सूचना यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त झालेल्या सूचना / हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा जनतेच्या अवलोकनासाठी खालील कार्यालयात उपलब्ध करण्यात आला आहेः—

(१) प्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय, ५ वा मजला, मनपा मुख्यालय, नवीन इमारत, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

(२) सहाय्यक आयुक्त 'एम/पूर्व' विभाग, एम. टी. कदम मार्ग, देवनार म्युन्सिपल कॉलनी समोर, गोवंडी (पश्चिम), मुंबई ४०० ०४३.

( ३ ) उद्यान अधीक्षक व वृक्ष अधिकारी यांचे कार्यलय २रा, मजला पेंग्वीन इमारत, वीर माता जिजाबाई भोसले उद्यान, भायखळा (पूर्व) मुंबई ४०००२७.

(४) उपसंचालक, नगररचना, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, इन्साहटमेंट, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

दिनांक ६ मार्च २०२६,
PRO/ ३२०८/ADV/२०२५-२६.

**सुनिल हि. राठोड,**
प्रमुख अभियंता (विकास नियोजन).

## BRIHNMUMBAI MUNICIPAL CORPORATION

*NOTIFICATION*

No. प्र.अ./वि.नि/१५८३२।पू.उप.—Whereas, as per the powers conferred by sub section (*1*) of Section 31 of the MR & TP Act, 1966, State Government has accorded sanction to the Draft Development Plan-2034 of Greater Mumbai (hereinafter referred to as "the said Development Plan") *vide* Notification No. TPB-4317/629/CR-118/2017/DP/UD-11, Dt. 08.05.2018 (hereinafter referred to as "the said Notification") along with the Development Control and Promotion Regulations-2034 for Greater Mumbai.

And whereas, as per the DP-2034, of 'M/East' ward, the land bearing C.T.S. No. 381 (pt.) of village Anik is affected by the reservation of Garden/Park (ROS 1.5) having area 14,180.25 Sq.mtr.

And whereas, Local public representative *vide* letter dated 17.03.2025, requested Municipal Commissioner, B.M.C., to modify the D.P. 2034 by adding the reservation of Swimming pool (ROS 2.2) in the reservation of Garden/Park (ROS 1.5) on land bearing C.T.S. No. 381 (pt.) of village Anik, in 'M/East' Ward.

And after receipt of approval from Superintendent of Garden and Tree Officer, the approval of Hon. Municipal Commissioner, B.M.C. is received for procedure of modification as per MR&TP Act, 1966.

And whereas, Administrator (Improvement Committee) *vide* Resolution No. 74 dated 27.11.2025 and Administrator (Corporation) *vide* Resolution No. 875 dtd 04.12.2025 has accorded sanction to initiate the modification proposal u/s. 37(1) of MRTP Act, 1966, to invite suggestions/ objections from general public to conduct hearing on said suggestions /objections and to make correspondence with State Govt. in Urban Development Dept for final sanction u/s. 37(2) of MRTP Act, 1966 for the proposed modification in Sanctioned DP 2034.

And whereas, as per circular u/no. BMC/ADMN/3 dt. 07.04.2022, under section 6C (1) of Mumbai Municipal Corporation Act, 1888 (hereinafter referred as 'MMC Act, 1888') all the powers of the Corporation are now vested with the Administrator.

And Whereas, in exercise of the powers conferred by sub section (*1*) and (*2*) of Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as ‘MR & TP Act, 1966’), the Planning Authority may, or when so directed by the State Government shall within one month from date of such directions publish a notice inviting suggestions/ objections from any person, as mentioned therein and after giving hearing, submit the proposed modification to the State Government and the State Government subject to such condition as it may deem fit sanction the modification or refuse to accord sanction.

Now, therefore, after considering the above facts and circumstances and in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of Section 37 of the MR & TP Act, 1966; and of all other powers enabling it in this behalf, Brihanmumbai Municipal Corporation (hereinafter referred as BMC) hereby publishes a Notice for inviting objections/suggestions from any persons with respect to proposed modification, as required by Section 37(*1*) of the said Act, for information of all persons likely to be affected thereby. BMC is further pleased to inform that any objections/ suggestions in respect of the proposed modification mentioned above may be forwarded, i writing before the expiry of 30 days from the date of publication of this notification to the office of

Chief Engineer (Development Plan)
Brihanmumbai Municipal Corporation,
5th Floor, Municipal Head office,
Mahapalika Marg, Fort, Mumbai 400 001.

Any objections or suggestions, which may be received within the said period will be dealt with in accordance with the provisions of Section 37(*1*) of the said Ac by the Chief Engineer (Development Plan) BMC. The Suggestions/Objection: received after expiry period of one month will not be considered.

A part plan showing the proposed modification is kept open for the inspection of the general public at the following offices :—

(1) Office of the Chief Engineer (Development Plan), 5th Floor, Brihanmumbai Municipal Corporation, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

(2) Office of Assistant Commissioner 'M/East', M.T. Kadam Marg, Opposite Deonar Municpal Colony, Govandi West, Mumbai 400 043.

(3) Officer of the Superintendent of Garden and Tree officer 2nd Floor, Humboldt Penguin Building, Veermata Jijabai Bhosale Udyan (Byculla Zoo), Byculla (East), Mumbai 400 027.

(4) Office of the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, having his office at ENSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

dated 6th March 2026,
PRO/ 3208 /ADV/2025-26.

S. H. RATHOD,
Chief Engineer,
(Development Plan).

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

क्र. उपायुक्त/४४६१/पा. सु. दिनांक १३ फेब्रुवारी २०२६

**जाहीर सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (आजतागायत सुधारित) च्या कलम २९७ (१) (ब) अन्वये खालीलप्रमाणे जाहीर सूचना देण्यात येत आहेः—

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 'पी/द' व 'पी/उ' विभागातील, आरे गावातील न. भू. क्र. २५अ व २५ब ला बाधित करणाऱ्या, १८.३० मी. रुंद विकास नियोजन रुंदीकरणापासून ते विद्यमान रस्त्यापर्यंत, जन. अरुण कुमार वैद्य मार्गाच्या (GMLR) ४५.७० मी. रुंद मंजूर नियमित रेषेचे नकाशा क्र. का. अ.वा.व.स./प.उ. / ररे / ३५१, दि. २०.०१.२०२६ मध्ये हिरव्या रंगाने 'अ' ते 'ब' दर्शविल्याप्रमाणे अद्ययावत सुधारित बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८, कलम २९७ (१) (ब) अन्वये पुनः रेखांकन करण्याचा प्रस्ताव दि. ११.०३.२०२६ रोजीच्या महापालिकेच्या सभेमध्ये किंवा त्यानंतर जेव्हा केव्हा सदरहु प्रस्ताव निकालात काढता येईल अशा महापालिकेच्या सभेत मांडण्यात येईल.

उपरोक्त प्रवर्तनात असलेली प्रस्तावित नियमित रेषा दर्शविणारा नकाशा क्र. का. अ.वा.व.स./प.उ. / ररे / ३५१, दि. २०.०१.२०२६, उप प्रमुख अभियंता (वाहतूक) यांच्या इंजीनीअरिंग हब इमारत, तळ मजला, डॉ. ई. मोजेस रोड, वरळी, मुंबई ४०० ०१८ येथील कार्यालयात व सहाय्यक आयुक्त, 'पी/दक्षिण' विभाग कार्यालय, न.भू.क्र. ७४६, पहाडी गाव एस. व्ही. रोड, गोरेगांव (प.), मुंबई ४०० १०४ व सहाय्यक आयुक्त, 'पी/उत्तर' विभाग कार्यालय, लिबेर्टी गार्डनजवळ, बी. जे. पटेल रोड, मालाड (प.), मुंबई - ६४ येथील कार्यालयात कार्यालयीन वेळेत निरीक्षणासाठी ठेवण्यात आला आहे.

ज्या कोणास उपरोक्त प्रस्तावित नियमित रेषेबाबत प्रतिवेदने/ हरकती पाठवावयाच्या असतील त्यांनी त्या महानगरपालिका चिटणीसांच्या कार्यालयात संबंधित सभेच्या दिवसाच्या अगोदर ३ (तीन) संपूर्ण दिवसांपूर्वी प्राप्त होतील अशाप्रकारे पाठवाव्यात. कृपया त्यानंतर पाठवलेली प्रतिवेदने / हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

दिनांक : ११ मार्च २०२६,
PRO/ 3234/ADV/2025-26.

उपायुक्त,
(पायाभूत सुविधा).

**BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION**

No. DMC(Infra)/4461/dated 13th FEB. 2026

**PUBLIC NOTICE**

Pursuant to Section 297(*1*) (*b*) of Mumbai Municipal Corporation Act, 1888, as modified up to date, the undersigned proposed to apply to the Municipal Corporation at their meeting to be held on or on such day thereafter, as the said application can conveniently be disposed off for authority to the following proposal.

"To re-align 45.70 m. wide sanctioned RL of EET&C for Gen. Arun Kumar Vaidya Marg (GMLR) from 18.30 m. wide DP widening to Existing Road affecting CTS No. 25 A & 25 B of village Aarey in P/South & P/North ward as shown 'A-B' in green colour on plan u/no. EET&C/WS/RL/351, dated 20.01.2026 under section 297(*1*) (*b*) of MMC Act, 1888".

A plan u/no. EE/T&C/WS/RL/351, dated 20.01.2026 showing the proposed Regular line to be prescribe in substitution thereof aforesaid is deposited at the office of Deputy Chief Engineer (Traffic) of Municipal Corporation and can be inspected by any desiring to do so, at any time during office hours at his office at Engineering Hub Building, Zero Floor, Dr. E. Moses Road, Worli, Mumbai 400 018 and also at the office of Assistant Commissioner 'P/South', CTS No. 746, village Pahadi, S. V. Road, Goregaon (W.), Mumbai 400 104 & Assistant Commissioner 'P/North', Near Liberty Garden, B. J. Patel Road, Malad (W.), Mumbai-64.

Every person desirous of making any representation to the corporation or of bringing before the Corporation any objection in respect of the said proposal may do so by letter addressed to the Municipal Secretary at the Mahapalika Head office, Mahapalika Marg, Fort, Mumbai 400 001 and deliver at the said office not less than 03 (three) clear days before the day of such meeting.

Dated this 11th day of March 2026, D.M.C.,

PRO/ 3234 /ADV/2025-26. (Infrastructure).

## पनवेल महानगरपालिका, पनवेल

## अधिसूचना

क्रमांक पमपा/सचिव/प्र.क्र.२/२०-२६/प्र.क्र.२/४५/२०२६, दि.११/०३/२०२६.—ज्याअर्थी, पनवेल महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५ सह महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम, २०१२ मधील नियम ३ च्या तरतुदी अन्वये नामनिर्देशित सदस्य निवडीसाठी दिनांक ०६ मार्च २०२६ रोजी सभा आयोजित केली होती ;

ज्याअर्थी, दिनांक ०६ मार्च २०२६ रोजीचे महासभेत विषय क्र. ३ द्वारे नामनिर्देशित सदस्यपदी ७ व्यक्तींच्या नेमणुकीस मान्यता देण्यात आली होती. त्याअर्थी महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२, चे नियम ६ चे तरतुदी अन्वये खालील परिशिष्टात पनवेल महानगरपालिकेचे नामनिर्देशित सदस्यांची नावे प्रसिध्द करण्यात येत आहेत.

### परिशिष्ट

| अ.क्र. (१) | नामनिर्देशित सदस्यांचे नाव (२) |
|---|---|
| १) | श्री. प्रथमेश चंद्रशेखर सोमण |
| २) | श्री. प्रकाश पंढरीनाथ म्हात्रे |
| ३) | श्री. नितीन सोपान गावंड |
| ४) | श्री. परेश राम ठाकूर |
| ५) | श्री. गणेश चंद्रकांत कडू |
| ६) | डॉ. अरुणकुमार शंकर भगत |
| ७) | श्री. दिनेश रविंद्र खानावकर |

पनवेल,
दिनांक : ११ मार्च २०२६.

**मंगेश चितळे,**
आयुक्त,
पनवेल महानगरपालिका.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.